नूतन शिक्षण प्रसारक मंडळ, देसाईगंज द्वारा संचालित

# आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय

देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली. (म.रा.) 441207

'नॅक' द्वारा पुनर्मूल्यांकीत 'बी' दर्जा (२.१६) प्राप्त

प्राचार्य
डॉ. शंकर कुकरेजा
M.Sc., Ph.D.

वेबसाईट : www.adarshcollegedesaiganj.com edu.in
ई-मेल : adarsh_desaiganj@rediffmail.com

फॅक्स : (07137) 273823
कार्यालय : (07137) 272554
मोबाईल : 9404818437

संदर्भ क्र. आमवी/४६/२०२०

दि. १५/०१/२०२०

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
आवक/जावक विभाग
आवक 328 दि. 20/1/20
जावक 328 दि. 20/1/20

618 20/1/2020

प्रति,

मान.प्राचार्य,

---------------------

---------------------

**विषय : एकल लावणी नृत्य स्पर्धेत सहभागी होण्याबाबत.**

वरील विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आमचे महाविद्यालयात सत्र २०१९-२० मधील ''वार्षिकोत्सव'' दिनांक १२ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी २०२० दरम्यान आयोजित केलेला आहे. या दरम्यान गोंडवाना विद्यापीठ स्तरीय एकल लावणी नृत्य स्पर्धा दिनांक १३ फेब्रुवारी २०२० रोज गुरुवार सकाळी १०:०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे.

सदर स्पर्धेतील विजेत्यांना महाविद्यालयातर्फे रोख पारितोषिके व स्मृती चिन्हं देवून गौरविण्यात येईल व सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र प्रदान करुन त्यांचा सन्मान करण्यात येईल.

तरी या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील एक स्पर्धक सहभागी करुन घ्यावे. ही विनंती.

धन्यवाद!

**पारितोषिक:**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथमबक्षिस | - | ३,००१/- | रोख व स्मृतीचिन्ह |
| द्वितीय बक्षिस | - | २,००१/- | रोख व स्मृतीचिन्ह |
| तृतीय बक्षिस | - | १,००१/-रोख व स्मृतीचिन्ह | |

प्रोत्साहनपर बक्षिस (दोन पुरस्कार) प्रत्येकी ५०१/- रोख व स्मृतीचिन्ह

प्रवेशिका स्विकारण्याची अंतीम दिनांक ८ फेब्रुवारी २०२० रोज शनिवार पर्यंत राहिल. प्रवेशिका भ्रमणध्वनी किंवा महाविद्यालयाच्या खालील मेल आय.डी वर नोंदविता येईल

ई मेल आय डी-adarsh_desaiganj@rediffmail.com

संपर्क
-प्रा. आर.एम. धोटे- ९४२०५५५१३५
प्रा.डॉ.जे.पी. देशमुख - ९४२१७३१४३८, ९४०४३२१११४

सहपत्र: स्पर्धेचे नियम व अटी सोबत जोडले आहे.

**स्पर्धेचेनियम व अटीः**

१. स्पर्धेचे प्रवेश शुल्क रु. १००/-राहील.

२. एका महाविद्यालयाची एक प्रवेशिका स्विकारली जाईल.

३. अधिकत्तम ३० प्रवेशिका स्विकारल्या जातील.

४. प्रवेशिका नोंदणीच्या अंतिम दिनांकापर्यंत स्विकारल्या जातील किंवा अधिकत्तम ३० प्रवेशिकेच्या मर्यादेपर्यंत प्रवेशिकांना नोंदणी क्रमानुसार प्राधान्य देण्यात येईल.

५. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे अधिकृत पत्र आवश्यक आहे.

६. स्पर्धकांने महाविद्यालयाचे ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

७. ज्या गितावर लावणी नृत्य सादर करावयाचा आहे त्या गिताचा संक्षिप्त सार प्रवेशिके सोबत दयावा.

८. लावणी नृत्य सादरीकरणासाठी जास्तीत जास्त ०७ मिनिटांचा कालावधी दिला जाईल.

९. स्पर्धकांची नृत्य सादरीकरण गित पेन ड्राइव्ह मध्ये स्पर्धा सुरु होण्यापूर्वी स्पर्धा सुत्र संचालकाकडे जमा करावे.

१०. स्पर्धकांनी लावणी नृत्यासाठी लागणारे साहीत्य सोबत आणावे.

११. ज्या लावणी गितावर नृत्य सादर करायचे आहेते गित मराठीचे असावे.

१२. स्पर्धकांना प्रवास खर्च व इतर भत्ते दिले जाणारनाही.

१३. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

१४ स्पर्धा संपल्यानंतर लगेच बक्षिस वितरण करण्यात येईल.

१५ सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येतील.

१६ स्पर्धेच्या नियमात बदल करण्याचा अधिकार आयोजकांना राहील.

प्रा.आर.एम. घोटे
सांस्कृतिक विभाग प्रमुख

प्राचार्य
डॉ. एस.जी. कुकरेजा
आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय
देसाईगंज

प्राचार्य
आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय
देसाईगंज (वडसा) जि. गडचिरोली